परिशिष्ट-"अ"

राज्यातील कृषि विद्यापीठांतर्गत कृषि तंत्र विद्यालयात सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षापासून तीन वर्ष कालावधीचा कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रम सुरु करणे संदर्भात मार्गदर्शक तत्वे व निकष.

सन २०१२-१३ च्या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील चारही कृषि विद्यापीठांतर्गत असलेल्या कृषि तंत्र विद्यालये उन्नत करुन तीन वर्ष कालावधीचा कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रम (सेमी — इंग्रजी माध्यम) खाजगी संस्थामार्फत विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे व निकष:

१. खाजगी संस्थांना विना अनुदानीत तत्वावर ३ वर्षाचा सेमी इंग्रजी माध्यमाचा कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रम राबविण्यासाठी २० हेक्टर जमीनअसणे आवश्यक आहे. त्यातील १० हेक्टर जमीन ही बागायती असणे अनिवार्य आहे.

२. राज्यातील चारही कृषि विद्यापीठाअंतर्गत असलेल्या कृषि तंत्र विद्यालयात सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षापासून सुधारित अभ्यासक्रम राबविण्यात येत असून सदर अभ्यासक्रमाची पुर्नरचना करुन तीन वर्ष कालावधीचा (१०+३) कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रम (सेमी — इंग्रजी माध्यम) सुरु करण्यासाठी सद्य:स्थितीत कृषि तंत्र विद्यालयांमध्ये उपलब्ध असलेल्या भौतिक सोयी-सुविधा, जमिन, इमारत व मनुष्यबळ इ. बाबींचा उपयोग करुन प्रस्तावित अभ्यासक्रमासाठी आवश्यक त्या सोयी-सुविधा, मनुष्यबळ, साधनसामुग्री इ. निर्माण करणे हे खाजगी संस्थांना बंधनकारक राहील.

३. कृषि विद्यापीठाअंतर्गत स्थानिक चौकशी समिती संबंधित संस्थेला भेट देवून सदरच्या अभ्यासक्रमासाठी संस्थेमध्ये आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध आहेत किंवा नाही याची पडताळणी करेल.

४. उपरोक्त समिती आपला अहवाल विद्यापीठाच्या कुलगुरुंना सादर करुन कार्यकारी परिषदेच्या मान्यतेने विहित मार्गदर्शक तत्वे / निकषानुसार मान्य करता येईल. मान्य झालेला अहवाल / प्रस्तावाबाबत काही त्रुटी आढळल्यास किंवा त्याबाबत काही तक्रारी असल्यास मा.अध्यक्ष, कृषि परिषद हे महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ मधील कलम ३१ मधील तरतुदीप्रमाणे पर्यवेक्षण करुन त्यासंबंधीचा निर्णय देतील.

DASAI OM\Agri-4A-7\नोट कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रम सुरु करणे 103 (प्रत).docx

५. तीन वर्ष कालावधीच्या कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रमास (सेमी–इंग्रजी माध्यम) खाजगी संस्थांना विना अनुदानित तत्वावर मान्यता देतांना सध्या विद्यापीठाअंतर्गत सुरु असलेल्या दोन वर्ष कालावधीच्या कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रमाचा दर्जा (ग्रेडेशन) निश्चित करावा. दर्जा ठरवितांना साधन सामुग्री, उपलब्ध सोयी-सुविधा व मनुष्यबळ विचारात घेण्यात यावे.

६. मुलभूत सोयी सुविधा असणेबाबत संस्थेने काटेकोरपणे पालन केले पाहिजे.

७. कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रमासाठी प्रति वर्षी ६० विद्यार्थी प्रवेश क्षमता राहील.

८. कृषि तंत्र निकेतन उत्तीर्ण होणारे विद्यार्थी कृषि व संलग्न शाखेच्या पदवी अभ्यासक्रमाच्या (कृषि, उद्यानविद्या, वनशास्त्र, मत्स्य, कृषि जैवतंत्रज्ञान, कृषि व्यवसाय व्यवस्थापन आणि गृहशास्त्र) द्वितीय वर्षाच्या प्रवेशास पात्र होतील. (कृषि अभियांत्रिकी वगळून) द्वितीय वर्षात प्रवेश देतांना २० टक्के जागा राखीव राहतील व प्रवेश गुणानुक्रमे देण्यात येईल (अतिरिक्त)

९. जे विद्यार्थी द्वितीय वर्षाच्या कृषि पदवी अभ्यासक्रमासाठी गुणाक्रमाने पात्र होऊ शकले नाहीत, अशा विद्यार्थ्यांना कृषि व संलग्न शाखेतील पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशास पात्र राहतील (कृषि अभियांत्रिकी वगळून) व त्यांना एकूण प्रवेशक्षमतेच्या १० टक्के जागा राखीव राहतील (अतिरिक्त) अथवा त्यांना १० टक्के गुणांचा अधिभार देण्यात येईल.

१०. इयत्ता १२ वी शास्त्र उत्तीर्ण होणारे विद्यार्थी तीन वर्षाच्या (सेमी इंग्रजी माध्यम) कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षाच्या प्रवेशास पात्र राहतील व त्यांना प्रथम वर्षातील कृषि व संलग्न विषय पूर्ण करणे अनिवार्य राहील.

११. दोन वर्ष कालावधीच्या कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण होणारे विद्यार्थी तीन वर्षाचा (सेमी इंग्रजी माध्यम) कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रम उत्तीर्ण होण्यासाठी त्यांनी प्रथम व द्वितीय वर्षातील सामान्य विज्ञान-१ व २ (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्र) व इंग्रजी तर तृतीय वर्षातील पर्यावरण शास्त्र, संगणक व कृषि सांख्यिकी शास्त्र, ग्रामसेवकांची प्रणाली व प्रशिक्षण इ. हे विषय पूर्ण करणे अनिवार्य राहील.

१२. कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रमाचा कालावधी तीन वर्षे असून (१०+३) अभ्यासक्रमाचे माध्यम सेमी-इंग्रजी असेल. सदरच्या अभ्यासक्रमात प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षासाठी एकूण ९८ विषयांचा समावेश असून प्रथम व द्वितीय वर्षाच्या वार्षिक परिक्षा (लेखी व प्रात्यक्षिक) कृषि

तंत्र निकेतनमध्ये घेण्यात येतील. तसेच तृतीय वर्षाच्या प्रात्यक्षिक परिक्षा कृषि तंत्र निकेतनात व लेखी परिक्षा केंद्रीय पध्दतीने जिल्हयाच्या ठिकाणी घेण्यात येतील.

१३. सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षापासून प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी विना अनुदानित कृषि तंत्र निकेतनासाठी प्रतिवर्षी रु.२०,०००/- हे शैक्षणिक शुल्क आकारण्यात येईल. विहीत केलेल्या शुल्कापेक्षा जास्त शुल्क आकारता येणार नाही.

१४. कोणत्याही प्रकारची कॅपिटेशन फी, देणगी किंवा इतर रक्कम स्विकारता येणार नाही. यामध्ये व्यवस्थापन कोटयातील जागा अंतर्भूत आहेत.

१५. कृषि शाळा / निकेतन अभ्यासक्रमाचा शैक्षणिक दर्जा उच्चतम राखण्याच्यादृष्टीने कृषि विद्यापीठाअंतर्गत संशोधन / महाविद्यालयाचे प्राध्यापकांचा उपयोग करावा. त्यासाठी त्यांना योग्य ते मानधन दयावे. प्राध्यापकांनी वर्षातून एकदा अचानक व एकदा वेळ ठरवून भेट देवून संनियंत्रण करावे. भेटीनंतर काही त्रुटी आढळून आल्यास त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी एक वर्षाचा कालावधी दयावा. याचे संनियंत्रण सहयोगी अधिष्ठाता (निम्न शिक्षण) यांनी करावे.

१६. कृषि विद्यापीठाच्या स्थानिक चौकशी समितीच्या अहवालाबाबत कार्यकारी परिषदेच्या बैठकीत चर्चा होऊन कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रमास दोन वर्षासाठी विद्यापीठामार्फत मान्यता / संलग्नता देण्यात येईल.

१७. मान्यता प्राप्तीच्या सुरुवातीच्या काळात विद्यापीठाची समिती संस्थेच्या निकेतन अभ्यासक्रमाच्या प्रगतीवर देखरेख करेल. विहित नियमानुसार सदर समितीचा प्रवासभत्ता व दैनंदिन भत्त्याचा खर्च संस्थेला करावा लागेल.

१८. कोणत्याही प्रकारचे न्यायालयीन खटले / प्रकरणे, प्रवेशाबाबत किंवा इतर बाबतीत, संबंधित संस्था हाताळील अशा प्रकरणी कृषि विद्यापीठ / कृषि परिषद / शासन जबाबदार राहणार नाही.

१९. संबंधित संस्थेकडून विहीत नियम / आदेशांचे आणि मार्गदर्शक तत्वे / निकषांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यास संस्थेची मान्यता रद्द करण्याचा किंवा संस्था रद्द करण्याचा अधिकार कृषि विद्यापीठास राहील. या संदर्भात सदर संस्था पूर्णपणे जबाबदार राहील. मात्र या विषयी सदर संस्थेस मा.मंत्री (कृषि) तथा अध्यक्ष कृषि परिषद यांच्याकडे दाद मागता येईल.

उक्त विषय निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार मा.मंत्री (कृषि) तथा अध्यक्ष, कृषि परिषद यांना असतील.

२०. संस्थेमध्ये / अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची आणि त्यामधील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या रोजगाराची जबाबदारी शासन / कृषि विद्यापीठावर राहणार नाही.

२१. या संदर्भात महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ आणि महाराष्ट्र कृषि विद्यापीठ परिनियम १९९० लेखा संहिता १९९१ तसेच शासन / महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद / कृषि विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांचा / कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

D:\SAI OM\Agri--\A-7\जोट कृषि तंत्र निकेतन अभ्यासक्रम सुरु करणे 105 (पत्र).docx